# अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचा वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा व कलावंत मेळावा.

प्रतिवर्षी नाटककार गो. ब. देवल यांच्या स्मृतिप्रित्यर्थ १४ जून रोजी वार्षिक पारितोषिक वितरण समारंभाचे आयोजन करण्यात येते. या वर्षी १४ जून आणि २५ जुलै २०१४ या दोन दिवशी पारितोषिक वितरण समारंभाचे आयोजन नाट्य परिषदेच्या यशवंत नाट्यमंदिरात करण्यात आले. २५ जुलै २०१४ रोजी **मा. श्री. स्वरूपकुमार तथा अनंत मेहंदळे आणि मा. श्रीमती वत्सला देशमुख** यांना जीवन गौरव पुरस्कार तसेच अनेक नामवंत कलावंताचे पारितोषिके देऊन सन्मान करण्यात आले. दिनांक १४ जून २०१४ रोजी कलावंत मेळाव्यात नाट्यपरिषदेच्या आठ शाखांनी कार्यक्रम सादर केले. त्यानंतर 'संगीत मत्स्यगंधा' नाटकाला पन्नास वर्षे पूर्ण झाल्याबद्दल 'संगीत मत्स्यगंधा' नाटकाचा प्रयोग देवल स्मारक मंदिर, सांगली, या संस्थेतर्फे सादर करण्यात आला. नाटकाच्या पूर्वी 'संगीत मत्स्यगंधा' नाटकात पूर्वी काम केलेल्या श्रीमती आशालता, श्रीमती फैय्याज, श्रीमती इंदुमती पैंगणकर, श्री. मोहनदास सुरवटणकर, श्रीमती भारती मंगेशकर, श्रीमती ललिता केंकरे आणि श्रीमती शोभा आर्य यांचा सत्कार करण्यात आला.

दिनांक २५ जुलै २०१४ रोजी पारितोषिक वितरण समारंभात श्री. ह्रषिकेश जोशी लिखित व दिग्दर्शित 'स्मरण... सुवर्ण क्षणांचे' हा कार्यक्रम सादर करण्यात आला. त्यात श्री. आनंद भाटे, श्रीमती सावनी कुलकर्णी, श्रीमती मधुरा वेलणकर आणि श्रीमती नेहा जोशी यांनी भाग घेतला.

## नाट्यलेखन स्पर्धा

९४ व्या नाट्य संमेलनाच्या निमित्ताने रंगभूमीच्या अभिवृद्धिसाठी नाट्यलेखन स्पर्धा आयोजित केली होती. त्यात एकूण ४९ संहिता पाठविण्यात आल्या होत्या. या स्पर्धेचे परिक्षक म्हणून डॉ. अनिल बांदिवडेकर, श्री. महेंद्र तेरेदेसाई आणि श्री. संजय कुलकर्णी यांनी काम पाहिले. नाट्यलेखन स्पर्धेचा निकाल खालीलप्रमाणे :

प्रथम क्रमांक रू. २१,०००/- श्री. आनंद खरबस, नाटक - एस्कॅलॅबो
द्वितीय क्रमांक रू. ११,०००/- श्री. आनंद हरिभाऊ जोशी, नाटक - समाधी
तृतीय क्रमांक रू. ७,०००/- श्री. प्रल्हाद जाधव, नाटक - डोन्ट वरी बी हॅपी
विशेष पारितोषिक डॉ. श्रीकृष्ण जोशी, नाटक - संगीत ऋणानुबंध
उत्तेजनार्थ श्री. रामदास गेरसप्पा, नाटक - कंबर लचकली, श्री. वामन काळे, नाटक - असं असत नाटक
आणि श्री. विद्याधर दाते नाटक - प्रतिमेची गोष्ट

सदर नाट्यलेखन स्पर्धेचे पारितोषिक वितरण दिनांक २५ जुलै २०१४ रोजी करण्यात आले.

## कै. वसंत जाधव एकांकिका स्पर्धा

नाट्यपरिषदेचे निरलस कार्यकर्ते आणि ज्येष्ठ नाटककार 'कै. वसंत जाधव' यांच्या स्मरणार्थ गेल्या वर्षापासून नाट्यपरिषदेने 'कै. वसंत जाधव खुली एकांकिका स्पर्धा' मुंबई मर्यादित आयोजित केली. त्याला उदंड प्रतिसाद लाभला आणि प्राथमिक फेरीसाठी २४ संस्थांनी भाग घेतला. या स्पर्धेची प्राथमिक फेरी दिनांक ११ ऑगस्ट २०१४ रोजी मुलुंड केंद्रावर, दिनांक १४ ऑगस्ट २०१४ रोजी बोरिवली केंद्रावर आणि दिनांक १६ ऑगस्ट २०१४ रोजी मुंबई केंद्रावर संपन्न झाली. प्राथमिक फेरीसाठी परिक्षक म्हणून मुलुंड केंद्रावर श्री. हेमंत भालेकर आणि श्री दिलीप गुजर, बोरिवली केन्द्रावर श्री उपेंद्र दाते आणि प्रमोद सुर्वे आणि मुंबई केन्द्रावर श्री. भालचंद्र कुबल आणि श्रीमती अंजली वळसंगकर यांनी काम पाहिले. स्पर्धेची अंतिम फेरी २२ ऑगस्ट २०१४ रोजी यशवंत नाट्यमंदिर येथे संपन्न झाली. अंतिम फेरीमध्ये एकूण ७ एकांकिका सादर करण्यात आल्या. त्यातून खालील एकांकिकांना बक्षिसे देवून गौरविण्यात आले.